माहितीचा
अधिकार

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊस, ठाकरसी हाऊस,
३ रा मजला, शुरजी वल्लभदास मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१.
ई-मेल - ad.admin@mahakosh.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२-२२६२२०२९ /३६ संकेतस्थळ - www.mahakosh.in

---

क्र.संलेको/०३.२०१८/प्रशा राप/का.४/बदली २०१८/ 228 दि. 07 MAR 2018

**संदर्भ :-** १. सामान्य प्रशासन विभागाची अधिसूचना क्र.एसआरव्ही. २००४/प्र.क्र.१५/०४/१२, दि.२५.०५.२००६

२. सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.सीडीआर-१०९५/१०७/(प्रकरण-७/९५)/अकरा, दि.०६.०५.१९९५

## //प रि प त्र क//

उपरोक्त संदर्भ क्र.१ मध्ये नमूद केलेल्या बदली अधिनियम २००५ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील वर्ग १ व वर्ग २ मधील अधिकाऱ्यांच्या बदल्या माहे मे-२०१८ मध्ये करण्याचे प्रस्तावित आहे.

१. त्या अनुषंगाने ज्या अधिकाऱ्यांना त्यांच्या बदली आदेशाच्या दिनांकापासून दि.३१.०५.२०१८ रोजी किमान ३ वर्षांचा कालावधी पूर्ण झाला आहे अशा अधिकाऱ्यांकडून त्यांच्या प्रशासकिय बदलीकरीता पसंतीक्रम मागविण्यात येत आहेत.

२. प्रशासकिय बदलीस पात्र असलेल्या अधिकाऱ्यांनी सोबतच्या विहीत नमुन्यात त्यांचे पसंतीक्रम दि.३१.०३.२०१८ पर्यंत संचालनालयात पाहोचतील या बेताने पाठवावेत. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. तसेच या परिपत्रकाच्या प्रसिध्दीपूर्वी बदलीसाठी केलेल्या अर्जावर विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. त्यामुळे परिपत्रकाच्या प्रसिध्दीपूर्वी बदलीसाठी अर्ज सादर केलेल्या अधिकाऱ्यांनी नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे.

३. विनंतीने बदलीसाठी अर्ज करणाऱ्या अधिकाऱ्यांनी सध्याच्या कार्यालयात रुजू दिनांकापासून दि.३१.०५.२०१८ रोजी किमान १ वर्ष सेवा कालावधी पूर्ण करणे आवश्यक आहे.

४. मानव संसाधन व्यवस्थापन प्रणाली (HRMS) मध्ये अपूर्ण माहिती असलेल्या अधिकाऱ्यांच्या बदली अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

५. संदर्भ क्र.२ मध्ये नमूद सामान्य प्रशासन विभागाच्या तरतूदीनुसार अधिकाऱ्यांनी त्यांच्या सेवाविषयक बाबींसंबंधीच्या तक्रारींचे निवारण आणि वैयक्तीक कामे करुन घेण्यासाठी खासदार, आमदार, राजकिय संघटनांचे कार्यकर्ते आणि इतर अशासकीय व्यक्ती यांच्यामार्फत त्यांची गाऱ्हाणी मा.मंत्र्यांकडे नेऊ नयेत आणि तसे केल्याचे आढळून आल्यास ते शिस्तभंग कारवाईस पात्र ठरतील.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सर्व अधिकाऱ्यांनी याची नोंद घ्यावी.

(ज.र.मेनन)
संचालक, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

# नियमित/विनंती बदलीसाठी अर्ज

दिनांक:-

प्रति,

संचालक,
लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय :- नियमित/विनंती बदलीच्या वेळी पसंतीक्रम विचारात घेण्याबाबत.

महोदय,

सन २०१८ च्या प्रशासकीय / विनंती बदली करिता मी खालील प्रमाणे माहिती सादर करीत आहे.

**१) आवश्यक वैयक्तिक माहिती :-**

i. नांव :- ------------------------------------------------------ पदनाम -------------------
ii. सध्याचे कार्यालय :- ----------------------------------------------------------------------
बदली आदेश दिनांक :- ------------------- सध्याच्या कार्यालयात रूजू दिनांक :----------------
iii. संवर्गातील प्रत्यक्ष नियुक्ती दिनांक : ---------------------------------------------------------
जन्मदिनांक :- ------------------------------सेवानिवृत्ती दिनांक :- --------------------------
स्वग्राम जिल्हा ---------------------------
iv. शिक्षण:- ------------------------------ विशेष कल /नैपुण्य/ संगणक रुची :-----------------
v. विभागीय चौकशी /न्यायालयीन प्रकरण प्रलंबित आहे का ? होय / नाही. (असल्यास सविस्तर तपशिल द्यावा.)
vi. महसुली विभाग वाटप नियम लागू आहे काय ? :- होय / नाही. (असल्यास विभागाचे नाव --------- व कोणत्या आदेशानुसार संवर्ग लागू झाला तो आदेश दिनांक ---------------)

**२) आजपर्यंतच्या पदस्थापनांचा तपशील :-**

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | सेवेचा प्रकार (नियमित / प्रतिनियुक्ती) | पासून | पर्यंत | प्रवर्ग अ.क्र.* (टिप १ प्रमाणे) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |

टिप- १* खालील सहा प्रवर्गापैकी एक :-

१. कोषागार /अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय
२. जिल्हा परिषद/ जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
३. स्थानिक निधी लेखा
४. महानगरपालिका / नगर परिषदा
५. सार्वजनिक उपक्रम / अन्न व नागरी पुरवठा / दुग्धशाळा (कमर्शिअल अकाऊंटिंग)
६. जिल्हाधिकारी व इतर शासकीय कार्यालये

**३) प्रशासकीय (नियमित) बदली करिताचा पसंतीक्रम :-**

| क्रमाने पसंती | जिल्हा / कार्यालयाचे नाव | प्रवर्गाचा अ.क्र.* (टिप-१ प्रमाणे) | अभिप्राय |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

**४) विनंती बदली करिताची माहिती :-**

| | | |
|---|---|---|
| (i) | विनंती बदलीचे कारण (सविस्तर नमूद करावे) | |
| (ii) | वरील कारणासाठी पुरावे जोडण्यात आले आहेत काय ? | |
| (iii) | सध्याचे पदावर दि.३१.०५.२०१८ रोजी एक वर्ष पूर्ण झाले आहे काय ? | |
| (iv) | पसंतीक्रम (जिल्हा / कार्यालयाचे नाव) | i) |
| | | ii) |
| | | iii) |

**५)** वरीलप्रमाणे मी कळविलेली पसंती ही केवळ संचालनालयाच्या विचारार्थ आहे व त्यावर माझा हक्क प्रस्थापित होत नाही याची मला पूर्णपणे जाणीव आहे.

**६)** मी बदलीसंबंधी खासदार, आमदार, राजकीय संघटनांचे कार्यकर्ते आणि इतर अशासकीय व्यक्ती यांच्यामार्फत शासनावर दबाव आणल्यास शिस्तभंग कारवाईस पात्र ठरेन.

आपला / आपली,

(सही)

नाव :-

भ्रमणध्वनी क्र. :-

सूचना :-

१. प्रशासकीय बदली करिता सध्याच्या पदावर दिनांक ३१ मे २०१८ रोजी तीन वर्षाचा सेवावधी पूर्ण होणे आवश्यक आहे तर विनंती बदली हवी असल्यास दिनांक ३१ मे २०१८ रोजी सध्याच्या पदावर किमान एक वर्ष पूर्ण झालेले असावे.
२. सदरचा अर्ज दिनांक ३१ मार्च २०१८ पूर्वी संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई येथे प्राप्त होणे आवश्यक आहे.
३. उपरोक्त बदली अर्ज नमुना प्रसिध्द होण्यापूर्वी ज्या अधिकाऱ्यांनी नियमित/विनंती बदलीसाठी अर्ज सादर केले आहेत, त्यांनी सदरच्या नमुन्यात सुधारीत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. यापूर्वीचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.
४. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील प्रत्येक अधिकाऱ्याने वरील टिप-१ मध्ये नमूद सेवेच्या सहा प्रवर्गात काम करावे असे अपेक्षित आहे. त्यामुळे वरील अ.क्र.४ / ५ मध्ये पसंती दर्शविताना यापूर्वी ज्या प्रवर्गात ३ वर्षाचा कालावधी पूर्ण केला आहे तो प्रवर्ग वगळून पसंती दर्शवावी.